# एंजेलिक फाऊंडेशनचे हंस महिला फुटबॉल क्लबला इंडियन वुमन लिगच्या पात्रता फेरीसाठी प्रायोजकत्व

कोल्हापूर, - देशाच्या राजधानीत महिला फुटबॉलला प्रोत्साहन देण्यात एंजेलिक फाऊंडेशनने महत्त्वाचा वाटा उचचला आहे. आपल्या या प्रयत्नांना मूर्त देण्याचा प्रयत्न वुमन्स लिग क्वालिफायरच्या दुसऱ्या भागातही केला असून, फाऊंडेशनने दिल्लीच्या वुमन्स स्पोर्टस क्लबला त्यांचे या पात्रता फेरीतील (क्वालिफायर) ध्येय गाठण्यासाठी प्रायोजकत्व दिले आहे. यंदा या स्पर्धा कोल्हापूर येथे नोव्हेंबरपासून सुरू झाल्या असून, त्या डिसेंबर पर्यंत चालणार आहेत.

एंजेलिक फाऊंडेशनच्या या मदतीचा क्लबला खूपच उपयोग झाला आहे. नवी दिल्ली आणि हरयाणातील मुलींना व्यावसायिक साधने, स्पोर्टस किट आणि अर्थिकदृष्ट्या मदत मिळाली आहे. यंदा, या खेळाडूंना महाराष्ट्रात आणण्याच्या खर्चाची जबाबदारीही उचचली आहे.

एंजेलिक फाऊंडेशनच्या सीएसआर विभागप्रमुख जयश्री गोयल म्हणाल्या, ''गेल्या काही वर्षांपासून एंजेलिक फाऊंडेशनने मुलींच्या फुटबॉलला पाठिंबा दिला आहे. खेळ हा शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आरोग्यपूर्ण राहण्याचा सकारात्मक मार्ग आहे. मुलींना खेळाबरोबरच त्यांचे शैक्षणिक करिअर परिपूर्ण होण्यासाठीही आम्ही प्रयत्न करत राहणार आहोत.''

याबाबत संघातील खेळाडूंच्या क्षमतेबाबत बोलताना त्यांचे कोच परितोष शर्मा म्हणाले, '' मुलींना स्वत:मधील क्षमता आणि बुद्धिमत्ता उंचावण्यासाठी तसेच राष्ट्रीय संघातून त्याचे सादरीकरण करण्यासाठी इंडियन प्रिमिअर लीग क्वालिफायर हे सर्वोत्तम व्यासपीठ आहे. यातून आम्हाला खूप काही शिकायला मिळणार आहे अणि हंस वुमन्स फुटबॉल क्लब या संधीसाठी प्रचंड उत्सुक आहे. आमचे खेळाडू नक्कीच चांगला खेळ साकारतील. एंजेलिक फाऊंडेशनच्या आर्थिक समर्थनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. त्यांच्या मदतीशिवाय आमचा सहभाग शक्य नव्हता.''

राष्ट्रीय संघातील आपल्या सहभागाबद्दल आनंद व्यक्त करत संघाची कॅप्टन ज्योति बर्नेट म्हणाली, ''आमच्या संघाला आता कोणी रोखू शकत नाही. आम्ही कठोर सराव केला आहे आणि आता कामगिरी करायला तयार आहोत. एंजेलिक फाऊंडेशनचे आम्ही अतिशय ऋणी आहोत. त्यांनी आमच्या स्वप्नांना पाठबळ दिले आणि हिरो इंडियन लिगच्या क्वालिफायरसाठी संधी मिळवून दिली आहे. आम्ही कठोर मेहनत घेऊ.''

हंस वुमेन्स फुटबॉल क्लब हा दिल्लीमध्ये झालेल्या स्टेट वुमन्स फुटबॉल लीग चा विजेता संघ आहे. हा देशव्यापी स्पर्धांमध्ये सहभागी होणारा दिल्लीचा पहिला संघ असेल. इंडियन वुमन्स लीगचा पहिला सीझन यशस्वी केल्यानंतर - ज्यामध्ये सहा संघांचा समावेश होता- ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनने ही लीग अधिक स्पर्धात्मक करण्याचा निर्णय घेतला असून, देशातील जास्तीत जास्त संघ यामध्ये उतरविण्याचे ठरविले आहे. या माध्यमातून लीगने महिला फुटबॉलला लोकप्रियता मिळवून

देण्याबरोबरच नव्या दमाच्या खेळाडूंना स्पर्धात्मक वातावरणात खेळण्याचा महत्त्वपूर्ण अनुभव देण्याचे व्यासपीठ तयार केले आहे.